दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.** 14 **दिनांक :** 10, एप्रिल 2019

## अदयावत सुविधांयुक्त कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन हॉल बनतोय आंतरराष्ट्रीय बॅटमिंटन कोर्ट

**ठाणे**(10):विकासात्मक धोरणासोबतच क्रीडा क्षेत्रातही ठाण्याचा नावलौकिक होण्याच्या दृष्टीने ठाणे महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या विशेष प्रयत्नाने दादोजी कोंडदेव स्टेडियम येथील कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन हॉलमध्ये नवीन कोर्ट मॅट्स, आकर्षक रंगरंगोटी व एलईडी लाईटच्या साहाय्याने अद्यावत आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॅटमिंटन कोर्ट बनवण्यात आले आहे.देशभरात विविध ठिकाणी बॅटमिंटन कोर्ट असून महापालिकेने बनविलेले हे एकमेव आंतरराष्ट्रीय बॅटमिंटन कोर्ट आहे.

कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन हॉलमध्ये खेळाडूंना वूडन कोटवर तसेच कमी प्रकाशझोतात सराव करावा लागत होता. वूडन कोर्टवर सरावकरून राष्ट्रीय स्पर्धेत उच्च प्रकाशझोतात मॅट्सवर खेळावे लागत होते. ठाण्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या प्रयत्नाने कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन कोर्ट अद्यावत मॅट्स,आकर्षक रंगरंगोटी व एलईडी लाईटच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय धर्तीवर बनवण्यात आले आहे.

ठाणे महापालिकेच्या सय्यद मोदी बॅडमिंटन अकॅडमीचे प्रमुख प्रशिक्षक श्रीकांत वाड यांच्यासह १५ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील ५ आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह १५० खेळाडू कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन हॉलमध्ये सराव करत आहेत.महापालिकेच्यावतीने देण्यात आलेल्या सर्व आंतरराष्ट्रीय सुविधांमुळे ठाण्यात आता आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होणार आहेत.

**चौकट**

ठाणे महापालिकेने कै.खंडू रांगणेकर बटमिंटन हॉलमध्ये आंतरराष्ट्रीय पद्धतीचे बनविलेले बॅटमिंटन कोर्ट देशासाठी एक मानबिंदू ठरणार असून अनेक आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय खेळाडू सय्यद मोदी बॅडमिंटन अकॅडमीमधून तयार होतील याची खात्री आहे.- **श्रीकांत वाड**

............

वूडन कोटवर सरावकरून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मॅटवर खेळताना त्रास होत होता पण आता या सर्व अद्यवात मॅट्स व लाईटमुळे सराव करणे सोपे झाले असून आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे वातावरण आता ठाण्यात निर्माण झाले आहे.- **अमन फरोख संजय (राष्ट्रीय खेळाडू)**

........................

देशातील अव्वल अशा गोपीचंद अकादमीच्याधर्तीवर कै.खंडू रांगणेकर बॅटमिंटन कोर्टवर सुविधा देण्यात आल्या असून या अद्यावत मॅट्सवरील सरावाचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खूप फायदा होणार आहे.- **व्ही हारिका (राष्ट्रीय खेळाडू)**